# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर


क्र: मविनिआ/माअअ/९४/२०१९/१०००

दि. ०७.११.२०१९

प्रति,
श्री. अशोक आत्माराम गिरकर,
112, तांतिया जोगानी इंडस्ट्रियल इस्टेट,
सिताराम मिल कंपाऊंड, जे. आर. बोरीचा मार्ग,
मुंबई - 400011. लोअर परेल (पूर्व)

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. ०३.१०.२०१९ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. ११.१०.२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | वहनकर वीज ग्राहकांकडून वसूल करण्यासाठी बेस्टने आणि महावितरणने आयोगामधून परवानगी मागितली होती का? | आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाचे आदेश, दि. १२.०९.२०१८ च्या प्रकरण 203 चा 2017 आणि दि. २८.१०.२०१६ च्या प्रकरण 33 चा 2016 मध्ये उपलब्ध आहे. सदर आदेश आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर मोफत स्वरूपात उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेले आहे.<br>तसेच सुप्रीम कोर्ट आदेश दिनांक १० जुलै, २०१९ सिव्हील अपील क्रमांक १०४८८/२०१४ मध्ये उपलब्ध आहे. सदर आदेश https://sci.gov.in या संकेतस्थळावर मोफत स्वरूपात उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे. |
| २ | आयोगाने बेस्टला व महावितरणला वहनकर (wheeling charges) वीज ग्राहकांकडून वसुल करण्यास परवानगी दिली होती का? | |
| ३ | सध्या ऑक्टोंबर 2018 पर्यतच्या विद्युत देयकाच्या (Bill period 31.08.2018 to 30.09.2018) तिसऱ्या रकान्यामध्ये TDLR Refund (If applicable) शुन्य रक्कम असे नमूद केलेले होते. परंतु त्यानंतरच्या येणाऱ्या देयकांपासून सदर हा रकाना पूर्णपणे वगळण्यात आला आहे. त्याचा परतावा ग्राहकांना अद्याप मिळालेला नाही. सदर कर हा 10 लाख विद्युत ग्राहकांच्या देयकामार्फत वसूल केलेला आहे. हा परतावा ग्राहकांना मिळणार किंवा नाही याची माहिती द्यावी. | |
| ४ | विद्युत देयकाच्या रकान्यामध्ये बऱ्याच प्रकारचे चार्जेस दाखविलेले आहेत. त्यामुळे वीज ग्राहक जेवढी वीज वापरतात त्याच्या आकाराच्या (Energy Charges) जवळजवळ 90 टक्के बील जास्त येते. | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्रकरण १ मधील २ (फ) नुसार माहिती या व्याख्येतील गुणीत उत्तरामध्ये 'का' या प्रश्नांची उत्तरे समाविष्ट नाही. 'का' प्रश्न म्हणजे एखाद्या विशिष्ट गोष्टीचे समर्थन करण्याची कारणे विचारण्यासारखे आहे. अमूक एखादी विशिष्ट गोष्ट का करण्यात आली किंवा का केली नाही, याचे समर्थन देण्याच्या अर्थाने, त्याची कारणे नागरिकांना कळविणे शासकीय माहिती अधिकाऱ्यासाठी अपेक्षित नाही कारण नागरिक, केवळ |

| | | |
|---|---|---|
| | | माहिती मिळण्याची मागणी करू शकतो. असे समर्थन करणे ही बाब अभिनिर्णित करणाऱ्या प्राधिकरणांच्या अखत्यारीत येते आणि तिचे माहिती म्हणून योग्य प्रकारे वर्गीकरण करता येऊ शकत नाही. *(डॉ. सेल्सा पिंटो वि. गोवा राज्य माहिती आयोग व इतर २००८(४) ऑल महाराष्ट्र लॉ रिपोर्टर ७८६) चा आदेश.*<br>"माहिती" (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने, (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणांस मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. |

जर आपणांस प्रकरण क्र. 203 चा 2017 व 33 चा 2016 चे आणि सुप्रीम कोर्ट आदेश दिनांक १० जुलै, २०१९ सिव्हील अपील क्रमांक १०४८८/२०१४ आदेशाच्या संपूर्ण छायांकित प्रती हव्या असल्यास, माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार पुढीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

| मागणी केलेली माहितीची छायांकित प्रतीची एकूण पृष्ठे | प्रती पृष्ठ शुल्क रु. | एकूण माहिती शुल्क रु. | टपाल खर्च रु. (माहिती अर्जदार स्वत: घेऊन जाणार असल्यास टपाल खर्च आवश्यक नाही.) | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| ८४७ | २ | १६९४/- | अंदाजे रु. ५००/- | २१९४/- |
| | | | एकूण रु. | **२१९४/-** |

वरीलप्रमाणे आकारलेले शुल्क आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई या नावाने धनाकर्ष अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा आपल्या प्रतिनिधीद्वारे रोख रक्कम रू. १६९४/- जमा करुन शुल्क भरल्याची पावती /चलन पुरावा सत्य प्रत समक्ष सादर करुन आपणांस हव्या असलेल्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील.

माहिती अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19(1) अन्वये श्री. अनिलकुमार उके, संचालक (विधी) अतिरिक्त कार्यभार /प्रथम अपीलीय अधिकारी आहेत, पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर 1, 13 वा मजला, कफ परेड, मुंबई - 400005. टेलिफोन नं. 022-22163964/65/69 **Email: anilkumar.ukey@merc.gov.in**

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी